ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३१२ • शुक्रवार दि.११ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# मराठवाड्यातील दुष्काळ परिस्थितीकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष-खा.संजय राऊत



## शिवसेनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाड्यातील अनुशेष, सिंचन प्रकल्प, उद्योग व बेरोजगारीकडे राज्यातील महायुती सरकारने दुर्लक्ष केले आहे. मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर असतांना सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत असून शेतकऱ्यांच्या, महागाई व बेरोजगारांच्या प्रश्नांवर शिवसेना तिव्र आंदोलन करेल असा इशारा शिवसेना नेते खा.संजय राऊत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित आंदोलनात बोलतांना केला आहे.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शिवसेनेच्यावतीने 'तुमसे ना हो पायेगा' अंतर्गत मराठवाड्यात ठिकठिकाणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने आंदोलने केली जात आहेत. आज (शुक्रवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेनेच्या वतीने आयोजित आंदोलनात बोलतांना खा.संजय राऊत यांनी राज्यातील भाजप व मित्र पक्षाच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. बोगस व थापा मारणारे हे सरकार असून या सरकारने अनेक योजना बंद केल्या आहेत. उद्योगपतींचे हजारो कोटी रुपयांचे कर्ज भाजप सरकार तात्काळ माफ करते परंतु राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मात्र नियम, अटी व कागदपत्रांची पुर्तता लावली जात आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असतांना शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी तात्काळ करण्यात आली होती. मराठवाड्याच्या विकासासाठी राज्य सरकारने हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पाच्या घोषणा केल्या आहेत. घोषणेपैकी किती प्रकल्प प्रत्यक्षात सुरुवात झाली, किती प्रकल्प निधीअभावी रखडली याचा लेखाजोखा सरकारने जनतेसमोर मांडायला हवा. मराठवाड्याला हक्कासाठीही नेहमीच संघर्ष करावा लागतो. मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प निधी अभावी रखडली गेली आहेत. पावसाने दडी मारल्याने मराठवाड्यातील हजारो हेक्टरमधील पिके करपली गेली आहेत. दुष्काळाची तीव्रता जास्त असताना सरकारला याचे गांभिर्य नाही. मराठवाडा खदखदतोय, शेतकऱ्यांचा अंत पाहू नका, असा इशारा खा.संजय राऊत यांनी दिला. खा.राऊत यांनी माजी मुख्यमंत्री व खा.अशोक चव्हाण यांच्यावरही जोरदार टीका केली आहे. आपण भाजपमध्ये गेले आहात, केंद्र सरकारकडे दुष्काळाचा प्रश्न मांडून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्या, असे आवाहनही त्यांनी केले. मराठवाड्यातील प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास शिवसेना अधिक तीव्र रस्त्यावर उतरुन आंदोलन करेल, असा इशारा खा.संजय राऊत यांनी सरकारला दिला आहे. यावेळी विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आ.अंबादास दानवे, आ. प्रविण स्वामी, आ.डॉ. राहुल पाटील, पान ४ वर

# पोलीस पथकावरील हल्ल्या प्रकरणी संशयीतांची धरपकड

उमरी/प्रतिनिधी-उमरी तालुक्यातील इळेगाव परिसरात गोदावरी नदीपात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी कारवाईसाठी गेलेली बिलोलीचे पोलीस उपअधीक्षक श्याम पानेगावकर व पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात आला. या घटनेत पानेगावकर यांच्यासह काही कर्मचारी जखमी झाले. या घटनेतील संशयीत आरोपींची पोलीसांकडून धरपकड सुरु करण्यात आली आहे.

उमरी तालुक्यातील इळेगाव परिसरातील गोदावरी नदीपात्रात बोटीच्या सहाव्याने रेती उपसा सुरू असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांना मिळाली. त्यांनी बिलोलीचे पोलीस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांना तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथक इळेगाव परिसरात कारवाईसाठी गुरुवारी सायंकाळी नदी घाटावर गेले होते.पथक घटनास्थळी पोहोचल्यानंतर काही व्यक्तींनी पोलिसांच्या कारवाईला विरोध करीत दगडफेक सुरू करुन पोलीस पथकावर हल्ला केला. या घटनेत पोलीस उपअधीक्षक पानेगावकर यांच्यासह काही पोलीस कर्मचारी जखमी झाले. आरोपींकडून सात ते आठ पोलिस कर्मचाऱ्यांनाही मारहाण करण्यात आली. जखमी झालेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना नायगाव येथील पान ४ वर

# बँक कर्मचाऱ्यांच्या संपाला नांदेडमध्ये पाठिंबा

## एसबीआयसमोर कर्मचाऱ्यांची निदर्शने




नांदेड/प्रतिनिधी-युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स यांच्या आवाहनानुसार आज देशव्यापी बँक संपाच्या पार्श्वभूमीवर नांदेड येथे विविध बँकांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार निदर्शने केली. स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडस्ट्रियल एरिया शाखा, नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले होते.

या आंदोलनामध्ये बँकिंग क्षेत्रातील प्रलंबित मागण्यांकडे केंद्र सरकार व संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्यात आले. दिवसांचा बँकिंग आठवडा तातडीने लागू करावा व शनिवारचे बँकिंग कामकाज बंद करावे, ही प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच कामगिरीशी संबंधित प्रोत्साहन (पीएलआय) मधील भेदभावपूर्ण पद्धत मागे घेऊन कामगिरीशी संबंधित लाभांमध्ये समानता व न्याय सुनिश्चित करावा, तसेच बँक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा लवकरात लवकर निपटारा करावा, या मागण्याही करण्यात आल्या. यावेळी विविध बँकांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने आंदोलनात सहभाग नोंदवून आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. बँकिंग क्षेत्राच्या विकासात पान ४ वर

# एमपीएससी सचिवांच्या तोंडाला काळे फासले;संभाजी ब्रिगेडच्या तिघांना अटक



मुंबई/प्रतिनिधी-नवी मुंबईतील एमपीएससीच्या मुख्य कार्यालयात आज शुक्रवारी दि.११ सप्टेंबर रोजी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना घडली. या प्रकरणी नवी मुंबई पोलिसांनी संभाजी ब्रिगेडच्या तिघांना ताब्यात घेत अटक केली असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एमपीएससीच्या परीक्षांमध्ये कथित गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप आणि आयोगाच्या कारभारातील पारदर्शकतेवरून राज्यातील पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि नाशिक यांसह विविध ठिकाणी विद्यार्थ्यांकडून आंदोलने करण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडनेही एमपीएससीच्या कारभारा विरोधात आंदोलनाची भूमिका घेतली आहे.नवी मुंबईचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी या घटनेबाबत माहिती देताना सांगितले की, संभाजी ब्रिगेडच्या तीन कार्यकर्त्यांनी गुरुवारी (१० सप्टेंबर) एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची भेट घेतली होती. यावेळी काही पुरावे सादर करायचे असल्याचे सांगून त्यांनी पुन्हा भेटीसाठी वेळ मागितली होती. त्यानुसार शुक्रवारी तिघेही एमपीएससीच्या कार्यालयात आले.त्यातील दोघे जण सचिवांच्या भेटीसाठी आत गेले. संबंधित पुरावे मोबाईलमध्ये असल्याचे सांगून त्यांनी एक मोबाईल सोबत नेला होता. सचिवांशी चर्चा सुरू असतानाच दोघांनी त्यांच्या तोंडाला काळे फासले. या संपूर्ण पान ४ वर

# नांदेड जिल्ह्यासाठी दोन दिवस यलो अलर्ट जारी

नांदेड/प्रतिनिधी-प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्रांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि.११ व १२ सप्टेंबर २०२६ या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

गेल्या एक महिन्यापासून नांदेड जिल्ह्यात पावसाने पाठ फिरवली आहे. त्यामुळे शेतातील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पावसाने दडी मारल्यानंतर शेतकऱ्यांच्या नजरा रोज आकाशाकडे लागल्या आहेत. शेतातील पिके वाचतील या आशेने शेतकरी पावसाची वाट पाहत आहे. आता हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यासाठी दोन दिवस येलो अलर्ट जारी केला. दि.११ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. दि. १२ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्यासह विजांच्या कडकडाटात व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणा तसेच नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी केले आहे.

# कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर

## जीवनगौरवासाठी लड्डूसिंघ महाजन,इसाखान;पत्रकारिता रत्नाकर महाबळे,प्रेरणादायी कार्यकर्ता कॉ.वैशाली धुळे,कॉ.मीना हटकर,कॉ.प्रकाश बैलकवाड











नांदेड/प्रतिनिधी-प्रख्यात कामगार नेते तथा स्वातंत्र्य सैनिक दिवंगत कॉ.अनंतराव नागापूरकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार माजी नगरसेवक तथा गुरुद्वारा बोर्डाचे माजी अध्यक्ष सरदार लड्डूसिंघ महाजन आणि किनवट नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष इसाखान सरदार खान यांना जाहीर करण्यात आला आहे.

याशिवाय श्रमिक एकजीव पुरस्कार पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल लोहा येथील ज्येष्ठ पत्रकार रत्नाकर महाबळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तर प्रेरणादायी कार्यकर्ता पुरस्कार कंत्राटी सफाई कामगार तथा श्रमिक चळवळीतील कार्यकर्त्या कॉ. वैशाली धुळे, कॉ.मीना हटकर तर ग्रामरोजगार चळवळीचे कॉ.प्रकाश बैलकवाड यांना जाहीर झाला आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि सायं दैनिक नांदेड वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमात हे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. दिवंगत कॉ.अनंतराव नागापूरकर यांनी कामगार, श्रमिक आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षाची परंपरा पुढे नेण्याच्या उद्देशाने प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदाच्या पुरस्कारांची घोषणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सायं दैनिक नांदेड वार्ताचे संपादक कॉ. प्रदीप नागापूरकर, उपाध्यक्ष फारूक अहमद, कॉ. विजय गाभणे, सचिव राज गोडबोले, सहसचिव कॉ. शिवाजी फुलवळे, बालाजी पवार, कॉ.गणेश संदुपटला यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली.

# मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर येथे सुरु असलेल्या मटका अड्डयावर गुरुवारी सायंकाळी पोलीसांनी धाड टाकुन एका जणास अटक करण्यात आली आहे.

देगलूर शहरातील सार्वजनिक रोडवर मटका अड्डा सर्रासपणे सुरु होता. गुरुवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पोलीसाच्या पथकाने सदरील मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून कल्याण नावाचा मटका खेळवित असतांना नारायण काशिनाथ जनवाडे (वय ४४) रा.उंद्री (पदे) ता.मुखेड यास अटक केली. त्याच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख रक्कम पोलीसांनी जप्त केली आहे.

# सकारात्मक प्रतिसाद

**स्पर्धा परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी केवळ नोकरी मिळविण्याचा मार्ग नाही; ती त्यांच्या अनेक वर्षांच्या कष्टांची, स्वप्नांची आणि भविष्याची आशा असते. त्यामुळे परीक्षेतील गैरप्रकार हा केवळ एका प्रश्नपत्रिकेचा घोटाळा नसतो, तर तो हजारो-लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासावर झालेला आघात असतो. गेल्या काही वर्षांपासून देशात आणि राज्यात स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटना सातत्याने समोर येत असल्याने या विश्वासाला मोठा तडा गेला आहे. यामागची पार्श्वभूमीही लक्षात घेणे आवश्यक आहे. पूर्वी विविध शासकीय भरती परीक्षा वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत घेतल्या जात असताना गैरप्रकार, पेपरफुटी आणि परीक्षेतील अनियमिततेच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या. त्यामुळेच विद्यार्थ्यांनी एक ठोस भूमिका घेतली.शासकीय भरती कोणत्याही पदाची असो, परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फतच घ्यावी. एमपीएससी ही स्वतंत्र आणि विश्वासार्ह घटनात्मक संस्था असल्यामुळे तिच्याकडे परीक्षांची जबाबदारी सोपविल्यास परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण होईल, अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा होती.या अपेक्षेमागे विद्यार्थ्यांचा स्वार्थ नव्हता; उलट, निष्पक्ष परीक्षा व्यवस्थेसाठी त्यांनी एमपीएससीवर विश्वास ठेवला होता. परंतु आता याच आयोगाच्या परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना समोर येत असतील, तर विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणारी अस्वस्थता स्वाभाविक आहे. अलीकडे औषध निरीक्षक पदासाठी एमपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाने या अस्वस्थतेला आणखी तीव्र केले. परीक्षा प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या मनातला प्रश्न साधा आहे, आम्ही विश्वास कोणावर ठेवायचा? महाराष्ट्रापुरती ही समस्या मर्यादित नाही. राष्ट्रीय पातळीवर नीट सारख्या परीक्षांशी संबंधित गैरप्रकारांच्या आरोपांनी विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंता निर्माण केली आहे. यूपीएससी सारख्या देशातील अत्यंत प्रतिष्ठेच्या परीक्षांबाबतही प्रश्न उपस्थित झाले की, संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का बसतो. देशाच्या प्रशासनाची भावी पिढी निवडणाऱ्या परीक्षा जर संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या, तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करतात. अनेक जण वर्षानुवर्षे एकाच परीक्षेसाठी तयारी करतात. ग्रामीण आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीशी झुंज देत शहरात येतात, क्लासेस लावतात, पुस्तके घेतात आणि आपले तारुण्य स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पणाला लावतात. अशा वेळी काही व्यक्तींच्या गैरप्रकारामुळे प्रश्नपत्रिका फुटली आणि परीक्षा रद्द झाली, तर त्याचा फटका केवळ त्या एका परीक्षेला बसत नाही; विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक संपूर्ण वर्ष उद्ध्वस्त होऊ शकते.या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांकडे सकारात्मकतेने पाहिले, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि त्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेणे, हा लोकशाहीतील सकारात्मक दृष्टिकोन आहे. सरकारने घेतलेल्या या भूमिकेमुळे अस्वस्थ विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. मात्र, आता पुढची पायरी अधिक महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना केवळ आश्वासन नको आहे; त्यांना विश्वासाची पुनर्स्थापना हवी आहे. प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाचा निष्पक्ष आणि जलद तपास झाला पाहिजे. दोषी कोणत्याही पातळीवरचा असो, त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात प्रश्नपत्रिका फुटणारच नाही, अशी अभेद्य परीक्षा यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. एमपीएससी वरील विद्यार्थ्यांचा विश्वास हा सहज निर्माण झालेला नाही. त्या विश्वासासाठी विद्यार्थ्यांनीच एमपीएससीकडे अधिकाधिक परीक्षा देण्याची मागणी केली होती. त्यामुळे हा विश्वासघात केवळ विद्यार्थ्यांशी झालेला नाही; तो संपूर्ण परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी संबंधित आहे. सरकारने आता या संकटाला संधी मानून परीक्षा प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा कराव्यात. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून तिच्या छपाईपर्यंत, सुरक्षित वाहतुकीपासून परीक्षा केंद्रापर्यंत आणि उत्तरपत्रिकेपासून निकालापर्यंत प्रत्येक टप्पा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी केला पाहिजे. विद्यार्थ्यांचा संताप सरकार विरोधातील राजकारण म्हणून न पाहता त्यांच्या भविष्याची आर्त हाक म्हणून ऐकली पाहिजे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतलेला सकारात्मक पुढाकार या दृष्टीने आशादायी आहे. आता या सकारात्मक प्रतिसादाचे रूपांतर ठोस कृतीत झाले, तरच विद्यार्थ्यांच्या मनातील अविश्वास दूर होईल. कारण शेवटी प्रश्न एका परीक्षेचा नाही; प्रश्न आहे तो देशाच्या आणि राज्याच्या भावी पिढीच्या विश्वासाचा. हा विश्वास टिकविणे ही सरकारची, आयोगाची आणि संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी आहे.**

# जगातील धर्मनिरपेक्ष धर्मग्रंथ "श्री गुरु ग्रंथसाहेब"
# 'पहला प्रकाश' पर्व !



स.रवीन्द्रसिंघ मोदी
पत्रकार,नांदेड

श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारसरणीतून १५ व्या शतकात सिख (शीख) पंथाची पायाभरणी झाली. कालांतराने गुरु नानक देवजी नंतर त्यांच्या गुरुगादीचे वारस दूसरे गुरु श्री अंगद देव जी, तीसरे गुरु श्री अमरदास जी, चौथे गुरु श्री रामदास जी आणि पंचम गुरु श्री अर्जन देवजी यांच्या विचारांनी शीख पंथाचे मुख्य धर्मग्रन्थ श्री आदि गुरु ग्रंथसाहिब अस्तित्वात आले. सुरुवातीला पोथी साहिब म्हणून संबोधित करण्यात आले व कलांतराने श्री गुरु ग्रंथसाहिब असे नामकरण झाले. एका विशिष्ट संकल्पनेतूनच श्री गुरुग्रंथसाहेबांची रचना पार पडली म्हणायला हरकत नाही. मानवीय मूल्यांना धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्व देणाऱ्या एका नवसंप्रदायाचा प्रसार भारत भूमीवर सुरु झाला. गुरु नानकदेवजी यांच्या कथानानुसार एक पिता एकस के हम बारीक म्हणजेच एक परमात्म्याची आम्ही संतान होय अशी संकल्पना शीख गुरुंनी जगापुढे मांडली. अशीच संकल्पना भारतीय संस्कृतीत वावरणाऱ्या अनेक संतांनीही समाजापुढे प्रचारित केलेली होती. म्हणून शीख धर्माचे विस्तार त्याकाळात झपाट्याने होत गेले. आजच्या युगात मानवधर्म अबाधित ठेवण्यासाठी अशा विविध संतांच्या शिकवणीतून प्रेरणा घेण्याची नितांत गरज आहे, असे माझे व्यक्तिक मत आहे.

श्री गुरु नानकदेव जी यांनी त्यांच्या जीवनात चार दिशांच्या वेगवेगळ्या चार यात्रा (उदासी यात्रा) करून देशातील विविध जातिधर्माच्या, सम्प्रदायाच्या संत - महात्म्यांची भेटीगाठी घेतल्या होत्या. थोर संतांच्या अनुयायींच्याही भेटी घेत, त्यांच्या कडून संतांच्या वाणीचे संकलन गुरुजींनी करून घेतले. त्यापैकी मानव कल्याणाच्या भूमिकेतून श्रेष्ठ आणि भक्तीचे साधन म्हणून आत्मसात करता यावी अशा वाणींना गुरु अर्जन देव यांनी रागबद्धरित्या संपादन करून त्यास एका धर्मग्रंथाच्या स्वरूपात मांडणी केली. भाई गुरुदासजी यांनी वरील ग्रंथाच्या संपादन कार्यात गुरु अर्जनदेव यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण ग्रंथाचे लेखनकार्य पार पाडले. पंचम गुरु श्री अर्जनदेव यांनी या धर्मग्रंथाला सन १६०४ वर्ष मध्ये श्री हरिमंदर साहेब, अमृतसर (पंजाब) या ठिकाणी प्रथमतः प्रकाशित केले. या धार्मिक सोहळ्याला प्रथम प्रकाश म्हणून संबोधण्यात आले. याधार्मिक पर्वाच्या इतिहासाला आज तिथिनुसार ४२२ वर्षे पूर्ण झाली आहेत. श्री गुरु ग्रन्थसाहेबात महाराष्ट्रातील थोर संत, संत नामदेव महाराज यांची ६१ पदं आणि ३ श्लोकं समाविष्ट आहेत. ज्या १८ रागा मध्ये रागबद्ध असल्याचे आढळून येतात.

शीख धर्माचे संस्थापक व प्रथम गुरु श्री नानकदेवजी यांनी पृथ्वीवरील विविध धर्मं, पूजाशैली, संस्कृति आणि मानवीय जीवनाच्या अवलोकनासाठी चार वेगवेगळ्या दिशांच्या यात्रा केल्या. त्या यात्रेत त्यांनी विविध धर्मांच्या धर्मकेंद्रांना, तीर्थस्थळांना भेटीं देऊन माहिती संकलित करून घेतली. तसेच गुरुजींनी अनेक जातींच्या संतांशी किंवा त्यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन विविध भाषेतील वाणी (पाण्डुलिपि) संगृहीत केली. ज्या काळात गुरु नानकदेव यांनी उदासी यात्रा पार पाडल्या त्या काळात परिवहनाचे अत्याल्प साधन उपलब्ध होते. जवळपास वीस वर्षे गुरु नानक देव यांनी देशात विखुरलेल्या संतांच्या वाणींचे संकलनकार्य केले. नंतरच्या गुरुंनी जवळपास ६५ वर्षे संतांच्या वाणींचे लेखन व संवर्धनकार्य केले. त्यानंतर श्री गुरुग्रंथ साहेब या ग्रंथाचे अस्तित्व जगासमोर आले. श्री गुरुग्रंथसाहेब मध्ये सहा शीख गुरु, पंधरा संत-भक्त, चार शीख सेवक आणि अकरा भट्टांची वाणी क्रमबद्ध रित्या मांडण्यात आली आहे.

गुरुग्रंथ साहेब मध्ये सहा शीख गुरुंची वाणी दर्ज आहे. त्यामध्ये गुरु नानकदेवजी, गुरु अंगददेव जी, गुरु अमरदास जी, गुरु रामदास जी, गुरु अर्जुनदेव जी आणि गुरु तेगबहादुर यांच्या मूळ रचनां गुरुवाणीच्या रूपात रागबद्ध करण्यात आल्या आहेत. सोबतच संत किंवा भक्त म्हणून संत कबीरदासजी, भक्त सूरदासजी, भक्त भीखन जी, भक्त बेनी जी, भक्त रविदास जी, भक्त सैण जी, भक्त जैदेव जी, भक्त त्रिलोचनजी, भक्त पीपाजी, भक्त नामदेवजी, भक्त धन्ना जी, भक्त शेख फरीद जी, भक्त परमानन्द जी, भक्त रामानंदजी आणि भक्त सधना जी यांची वाणी क्रमबद्ध स्थान प्राप्त आहे. याशिवाय भाई मरदाना, भाई सत्ता जी, भाई बलवंड जी, बाबा सुन्दर जी या चार महापुरुषांच्या वाणीचे क्रम आहे. गुरुग्रंथ साहेबमध्ये अकरा भट्टांचीही वाणी किंवा श्लोकं समाविष्ट आहेत ज्या मध्ये कलसहार जी, जालप जी, कीरत जी, भीखा जी, मल जी, भल जी, नल जी, परमानन्द जी, मथुरा जी, बल जी आणि हरबंस जी यांच्या वाणी स्थान प्राप्त आहेत. अशा प्रकारे वेगवेगळ्या जाती-धर्मांच्या संतांची वाणी ग्रंथसाहेबात गुरुबाणी म्हणून स्वीकारण्यात आली आहे.


या ग्रंथाची संपादना पूर्ण झाल्यावर सन १६०४ मध्ये पाचवे गुरु श्री अर्जुनदेव यांनी पहिल्यांदा 'पोथी परमेश्वर का थान' या धार्मिक वाक्याच्या उच्चारणानंतर श्री हरिमंदर साहेब (सुवर्ण मंदिर), अमृतसर गुरुद्वारात 'ग्रंथसाहेब' म्हणून प्रकाशमान केले. महान ज्ञानी व्यक्तिमत्व असलेले बाबा बूढाजी यांनी ग्रन्थसाहेबांना पहिल्यांदा प्रकाशित करण्याचे बहुमान मिळाले. पुढे मुख्य ग्रंथी म्हणून बाबा बूढाजी यांनी जवाबदारी पार पाडली. कालांतराने सुमारे एकशे चार वर्षा नंतर सन १७०८ मध्ये दहावे गुरु, श्री गुरु गोबिंद सिंघजी महाराज यांनी नांदेड येथे याच गुरुग्रंथ साहेब यांना 'युगयुग अटल गुरु' म्हणून अकरावे गुरु म्हणून गुरुगादी प्रदान केली. तत्पूर्वी सन १७०५ मध्ये गुरु गोबिंदसिंघजी यांनी त्यांचे वडील, नवम गुरु श्री तेगबहादुर यांच्या ११५ पदांना गुरु ग्रन्थसाहेब मध्ये समाविष्ट केले होते.

श्री गुरु ग्रंथसाहेब या धर्मग्रंथात परमेश्वर भक्ती, साधना, जीवनशैली सोबतच मानवीय समाजाबद्दल आस्था निर्माण करण्यात आल्याचे दिसून येते. सर्वधर्मीय विचारांचे पूजन गुरु ग्रंथसाहेबांच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. ज्यावेळी एखादा मनुष्य गुरु ग्रन्थसाहेबांपुढे श्रद्धेने नतमस्तक होत असतो, त्यावेळी तो विविध धर्मांच्या ३६ संतांपुढेही नतमस्तक होत असतो. गुरु ग्रन्थसाहेबांच्या माध्यमातून जगभरात धर्मनिरपेक्ष तत्वांचे अमल व प्रसार होत आहे हे विशेष. विश्वात बंधुत्व वृन्दीगत होण्यासाठी गुरु ग्रंथसाहेब मधील सर्वसमावेशक शिकवण मोलाची ठरते. गुरु ग्रन्थसाहेबांचा पहला प्रकाश पर्व ही समस्त मानवांना पथप्रदर्शक ठरावा अशी मंगलकामना याप्रसंगी करू या.

# श्री गुरु ग्रंथ साहिबजी:मानवतेला ज्ञान,प्रेम आणि समानतेचा दिव्य प्रकाश
## प्रथम प्रकाश उत्सवाच्या निमित्ताने...

राजेंद्रसिंघ शाहू
नांदेड.

श्री गुरु ग्रंथ साहिब जी यांचा प्रथम प्रकाश उत्सव हा केवळ शीख इतिहासातील गौरवशाली दिवस नाही, तर संपूर्ण मानवजातीला ज्ञान, प्रेम, समानता, सेवा आणि मानवतेचा मार्ग दाखविणाऱ्या एका महान आध्यात्मिक परंपरेचा स्मरणदिन आहे.



पंचम पातशाह श्री गुरु अर्जन देव जी यांनी प्रथम पातशाह श्री गुरु नानक देव जी यांच्यापासून पुढे आलेली गुरु साहिबानांची पवित्र वाणी तसेच विविध संत, भक्त आणि महापुरुषांची वाणी एकत्रित करून मानवतेला एक अनमोल आध्यात्मिक ठेवा दिला. सन १६०४ मध्ये श्री हरमंदिर साहिब, अमृतसर येथे आदिग्रंथ साहिब जींचा प्रथम प्रकाश झाला. या ऐतिहासिक घटनेने भारतीय आध्यात्मिक इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले.

या महान ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे तो कोणत्याही एका जात, पंथ, भाषा किंवा समाजापुरता मर्यादित नाही. त्यातील संदेश संपूर्ण मानवजातीला जोडणारा आहे. गुरु वाणी स्पष्टपणे सांगते

**''अवल अलह नूर उपाइआ,कुदरत के सभ बंदे।
एक नूर ते सभ जग उपजिआ,कउन भले को मंदे''**

अर्थात, संपूर्ण सृष्टीची निर्मिती एकाच परमात्मिक नूरातून झाली आहे. मग कोण मोठा आणि कोण लहान? कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ? जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा सामाजिक स्तराच्या आधारावर माणसामाणसांत भेद करण्याला येथे कोणतेही स्थान नाही.

गुरु वाणी पुढे सांगते.

**''एक पिता एकस के हम बारिक...''**

आपला पिता एकच आहे आणि आपण सर्व त्याचीच लेकरं आहोत. हा विचार जर प्रत्येक माणसाने आपल्या जीवनात स्वीकारला, तर द्वेष, अहंकार, हिंसा आणि भेदभावाला जागाच उरणार नाही.

श्री गुरु ग्रंथ साहिब जी आपल्याला केवळ धार्मिक विधी शिकवत नाहीत; ते सत्याचा मार्ग स्वीकारून एक चांगला आणि संवेदनशील माणूस कसा बनायचा, हे शिकवतात. नामस्मरण, प्रामाणिक कष्ट, वाटून खाणे, निःस्वार्थ सेवा, नम्रता, सत्य आणि प्रत्येक जीवाबद्दल आदर ही त्यांच्या शिकवणीची मूलभूत मूल्ये आहेत.

शीख धर्माच्या ''सरबत दा भला'' या महान विचारामध्ये संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाची भावना सामावलेली आहे. गुरुद्वारांमधील लंगर परंपरा असो, निःस्वार्थ सेवा असो किंवा संकटाच्या काळात गरजूंच्या मदतीसाठी पुढे येण्याची परंपरा असोगुरुंच्या शिकवणीचा हा जिवंत आणि कृतीशील संदेश आहे.

आज जगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली, तरी माणसामाणसांतील द्वेष, हिंसा, धार्मिक संघर्ष, जातीय भेदभाव आणि असहिष्णुता अद्याप संपलेली नाही. अशा परिस्थितीत श्री गुरु ग्रंथ साहिब जींच्या वाणीचा प्रकाश आज पूर्वीपेक्षा अधिक आवश्यक आहे.

जिथे द्वेष आहे, तिथे प्रेम निर्माण करण्याची गरज आहे.

जिथे भेदभाव आहे, तिथे समानतेची ज्योत पेटविण्याची गरज आहे.

जिथे निराशा आहे, तिथे आशेचा किरण देण्याची गरज आहे.

आणि जिथे माणूस माणसापासून दूर जात आहे, तिथे मानवतेचे नाते अधिक घट्ट करण्याची गरज आहे.

प्रथम प्रकाश उत्सवाचा खरा अर्थ केवळ श्री गुरु ग्रंथ साहिब जींसमोर नतमस्तक होण्यात नाही, तर त्यांच्या शिकवणीला आपल्या आचरणात आणण्यात आहे. आपल्या विचारांत नम्रता, व्यवहारात प्रेम, कर्मात प्रामाणिकपणा आणि जीवनात सेवा आली, तरच गुरुंच्या वाणीचा खरा प्रकाश आपल्या जीवनात प्रकट झाला असे म्हणता येईल.

आजच्या या पावन प्रसंगी आपण एक संकल्प करूया. जात-पात विसरूया, भेदभाव दूर करूया, द्वेषाला नकार देऊया, मानवतेला स्वीकारूया आणि ''सरबत दा भला'' या विचाराने जीवन जगूया.गुरुंचा प्रकाश केवळ गुरुद्वाराच्या पवित्र परिसरातच नव्हे, तर प्रत्येक घरात, प्रत्येक हृदयात, प्रत्येक विचारात आणि प्रत्येक कर्मात प्रकट होऊ दे.

मानवतेच्या या महान संदेशामुळेच श्री गुरु ग्रंथ साहिब जी हे केवळ एका समाजाचे आध्यात्मिक मार्गदर्शक नसून संपूर्ण मानवजातीला प्रेम, समानता, शांतता आणि सत्याचा मार्ग दाखविणारे दिव्य ज्ञानसागर आहेत.

**धन धन श्री गुरु अर्जन देव जी।**
**धन धन श्री गुरु ग्रंथ साहिब जी।**
**गुरु नानक नाम चढदी कला तेरे भाणे सरबत दा भला।**

श्री गुरु ग्रंथ साहिब जींच्या प्रथम प्रकाश उत्सवाच्या समस्त मानवजातीला मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!


# विद्यार्थी बनले एक दिवसाचे शिक्षक;स्वयंशासन दिन उत्साहात

कुंडलवाडी/प्रतिनिधी- शिक्षक दिनाचे औचित्य साधून के. रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडी येथे स्वयंशासन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षकांची भूमिका स्वीकारत वर्ग अध्यापनाचे कार्य उत्स्फूर्तपणे व जबाबदारीने पार पाडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. एक दिवसाचे शिक्षक बनलेल्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे नियोजन, वर्गशिस्त, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे तसेच विविध विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगण्याचा अनुभव घेतला.या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्यातील जबाबदारीची जाणीव झाली. शिक्षकाची भूमिका साकारताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी, वर्ग व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधताना येणारे अनुभव याबाबत एकदिवसीय शिक्षकांनी आपल्या मनोगतातून विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक एन. जी. देवकरे उपस्थित होते. संस्थेच्या संचालिका रमा ठक्कूरवार, प्राचार्य संभाजी जाधव, उपप्राचार्या सपना म्हैसेवाड, पर्यवेक्षक संतोष भाले, एकदिवसीय संचालिका पूर्वजा कुलकर्णी, प्राचार्य धात्रक व उपप्राचार्या शिवलीला हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे एन. जी. देवकरे यांनी मार्गदर्शन करताना, ज्ञानाइतके पवित्र कार्य नाही. विद्यार्थी ही कोरी पाटी असते आणि शिक्षक त्यावर संस्काराचे धडे गिरवत असतात, असे सांगितले. कमी बुद्ध्यांक असलेल्या विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता आत्मविश्वासाने अभ्यास करावा आणि निश्चित ध्येय ठेवून प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असा प्रेरणादायी संदेशही त्यांनी दिला. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांना लेखणी भेट देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संस्थाध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कूरवार, प्राचार्य संभाजी जाधव व उपप्राचार्या सपना म्हैसेवाड यांनी संस्थेतील सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# भोकर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील भीषण अपघातात ८ जण ठार



## रस्त्याच्या बाजूला रक्ताच्या थारोळ्यात मृतदेहःनातेवाईकांचा आक्रोश

भोकर/प्रतिनिधी-भोकर नांदेड राष्ट्रीय महामार्गावर ट्रक व मॅजिकच्या झालेल्या भीषणअपघातात ६ जण जागीच ठार झाले तर अन्य दोन जणांचा नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या अपघातात १० जण गंभीर जखमी झाले आहेत त्यापैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे कळते. सदर घटना सीता खांडी घाट वळणावर वाकद शिवारात १० सप्टेंबर रोजी ७ वाजता घडली.

भोकरहून नांदेडकडे जाणारा ट्रक क्र.एपी २९ टीए ८१२९ भरधाव वेगात जात असताना सीता खांडी वळणावर वाकद शिवारात नांदेड हुन भोकरकडे येणाऱ्या मॅजिक क्रमांक एम एच २६ एके ० ५४८ ह्या मॅजिक ला जोराची धडक दिल्याने मॅजिक मधील अल्तमाश अलीमुद्दीन सगर बिलालनगर भोकर, पांडुरंग लिंगोजी वाघमारे, लक्ष्मीबाई पांडुरंग वाघमारे रा.सईद नगर भोकर, शेख फिरोज राहणार सईद नगर,बळीराम पवार पोटा तांडा ता.हिमायतनगर, शाहिद सौदागर हे जागीच ठार झाले आहेत. तर इतर १० जणांना उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले आहे त्यापैकी तिघांची परिस्थिती गंभीर असल्याचे समजते. वाकद शिवारात झालेल्या भीषण अपघाताने मॅजिकचा चक्काचूर झाला समोरून येणाऱ्या ट्रकने एवढी भिशन धडक दिली मॅजिक मधील १६ जण रस्त्याच्या बाजूला उडून २० फुटावर जाऊन पडले. अनेकजण रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. मदतीसाठी याचना करीत होते पोलिसांना घटनेची माहिती करतास पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन जखमींना भोकर ग्राम नांदेडला पाठविण्यात आले. सदर ट्रकचा चालक स्टेरिंग मध्ये अडकल्याने फक्त त्याचे हात तोंडवर होते. पूर्ण पाय अडकलेले होते रस्त्यावरील नागरिकांनी व पोलिसांनी त्याला ओढून काढले. इतर प्रवाशांना हलविण्यासाठी जुनेद पटेल, संदीप गौड, तौसीफ इनामदार यांच्यासह सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी मोलाचे प्रयत्न केले. भोकर ग्रामीण रुग्णालयामध्ये नातेवाईक व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती घटनास्थळी जिल्हा पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांनी भेट दिली. भोकरचे नगराध्यक्ष भगवानराव दंडवे व नगरसेवकांनी दवाखान्यात भेट देऊन घटनेचे अस्थिवायिकपणे चौकशी केली.

# पोलीसांनी गोवंशाची वाहतूक रोखली; सात जनावरांची सुटका

## पावणेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड/प्रतिनिधी-गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या महिंद्रा बोलेरो पिकअपवर मुक्रमाबाद पोलिसांनी कारवाई करुन ६ गोवंश व १ म्हैस अशा सात जनावरांची सुटका केली. या कारवाईत वाहनासह एकूण ९ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि राजू चव्हाण यांना पिकअपमधून गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी लखमापूर फाट्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला. यावेळी एम.एच. २६ बी.ई. ४०१० क्रमांकाची पिकअप अडवून तपासणी केली असता, वाहनात सात जनावरे दोरीने बांधून वाहतूक करताना आढळून आले. पोलिसांनी पंचांसमक्ष ८ लाख रुपये किंमतीचे वाहन आणि १ लाख ८० हजार रुपये किंमतीची जनावरे असा एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पंकज बालाजी चव्हाण (३६) रा.सन्मुखवाडी आणि गफुर शादुल साहब शेख (४५) रा.मुखेड यांच्याविरुध्द मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील व सुरज गुरव, तसेच सपोनि राजू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने केली.

# वन हुतात्मा प्रदीप खरात यांच्या त्यागाला वन विभागाचा सलाम!

किनवट/प्रतिनिधी-महाराष्ट्र वन विभागाच्या हरितसेना उपक्रमाअंतर्गत किनवट येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात ११ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय वन हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. वन आणि वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर वनयोद्ध्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यात आली. नांदेडचे उपवनसंरक्षक संदिप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.



या प्रसंगी सहायक वनसंरक्षक (जकासं) किरण चव्हाण, किनवटचे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) धिरज मदने, फिरत्या पथकाचे अधिकारी केंद्रे यांच्यासह किनवट परिक्षेत्रातील सर्व वनपाल, वनरक्षक, वनमजूर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान वन व वन्यजीवांचे रक्षण करताना कर्तव्यपथावर वीरमरण आलेले तत्कालीन वनपाल प्रदीप खरात यांच्या अतुलनीय त्यागाचे स्मरण करून अभिवादन केले. दरम्यान वनहुतात्मा खरात यांचे शौर्य आणि समर्पण वन विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी प्रेरणा देणारे आहे. त्यांचे हे बलिदान कधीही व्यर्थ जाणार नसल्याचे अनेकांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वन, वन्यजीव आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कटिबद्ध राहण्याची गांभीर्यपूर्वक शपथ घेतली.

# तपासणीच्या धास्तीने उमरीतील १२ मेडिकल दुकाने शटरडाऊन!

## तुकाराम मुंडे यांच्या पथकाच्या आगमनाची चर्चा

उमरी/प्रतिनिधी-शहरात तुकाराम मुंडे यांच्या पथकाकडून मेडिकल दुकानांची तपासणी होणार असल्याची चर्चा गुरुवारी (दि.१०) सकाळपासून सुरू होताच शहरातील तब्बल बारा मेडिकल दुकाने अचानक बंद करण्यात आली. दुकाने बंद करून संबंधित दुकानदार निघून गेल्याने औषध खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली. एकाच वेळी मोठ्या संख्येने मेडिकल दुकाने बंद राहिल्याने शहरात संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरातील काही मेडिकल दुकानांमध्ये नियमबाह्य पद्धतीने औषधांची विक्री होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. विशेषतः डी-कंपनीच्या गोळ्यांची विक्री होत असल्याच्या चर्चेमुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे. मात्र, या चर्चेला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. तुकाराम मुंडे यांच्या पथकाकडून तपासणी अथवा धाड पडण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाल्यानंतरच काही मेडिकल दुकानदारांनी घाईघाईने दुकाने बंद केल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. जर सर्व व्यवहार नियमानुसार सुरू असतील, तर तपासणीच्या भीतीने दुकाने बंद करण्याची वेळ का आली, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत. औषध विक्रीचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी आणि रुग्णांच्या जीविताशी असल्याने औषधांच्या विक्रीत कोणत्याही प्रकारची अनियमितता असल्यास त्याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय काही औषधांची विक्री केली जाते का, औषधांची खरेदी-विक्री नोंद व्यवस्थित ठेवली जाते का, प्रतिबंधित किंवा नियमबाह्य औषधांची विक्री होते का, याची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.दरम्यान, गुरुवारी सकाळपासून अनेक मेडिकल दुकाने बंद असल्याने नियमित औषधे घेणारे रुग्ण, वृद्ध नागरिक तसेच तातडीने औषधांची गरज असलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

# गणेशोत्सव १०० टक्के डीजेमुक्त करा;समाजप्रबोधनाला प्राधान्य द्या

## उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांचे शांतता समितीच्या बैठकीत आवाहन

कुंडलवाडी/प्रतिनिधी-गणपती ही बुद्धीची देवता असून, गणेश मंडळांनी गणेशोत्सवाच्या काळात शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि युवकांना प्रोत्साहन देणारे समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करावेत. पारंपरिक वाद्यांचा वापर करून गणेशोत्सव १०० टक्के डीजेमुक्त वातावरणात साजरा करावा, असे आवाहन धर्माबादचे उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांनी केले.

पोळा व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी येथील नगरपरिषद सभागृहात पोलीस प्रशासनाच्या वतीने शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील होते.यावेळी तहसीलदार गजानन शिंदे, कुंडलवाडीच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार, महावितरणचे कनिष्ठ अभियंता सुरेश गटूवार, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर येन्नावार, उपाध्यक्ष प्रतिनिधी शैलेश ऱ्याकावार आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना दशरथ पाटील म्हणाले की, सण-उत्सव साजरा करताना इतर नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी. गावातील पुढील पिढी सुसंस्कारित आणि सक्षम करण्यासाठी व्यसनमुक्तीवर भर देणे आवश्यक आहे. गावातील नशापाणी पूर्णपणे बंद करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्यक्रम घेऊन मुला-मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहनही त्यांनी केले.बैठकीत तहसीलदार गजानन शिंदे, सोसायटीचे माजी अध्यक्ष साईनाथ उत्तरवार, ज्येष्ठ नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, कनिष्ठ अभियंता सुरेश गटूवार, मोहम्मद अफजल, पोलीस पाटील साहेबराव डोंगरे, भक्ती गणेश मंडळाचे राजेश कळसाई यांनी आपले विचार मांडले.यावेळी उपस्थित मान्यवरांचा पोलीस ठाण्याच्या वतीने शाल व वृक्ष भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नगरपरिषद कर्मचारी, विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, दत्तात्रय गिरी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. नरेश बोधनकर यांनी केले, तर आभार गजेंद्र मांजरमकर यांनी मानले.

# प्रारुप मतदार यादी अंतिम नसून, पात्र मतदारांनी नोंदणीची संधी घ्यावी

नांदेड/प्रतिनिधी-राज्यात सध्या विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत प्रकाशित करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ही अंतिम मतदार यादी नसल्याने, तिची २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील मतदारसंख्येशी अथवा मतदानाच्या आकडेवारीशी तुलना करणे अयोग्य व दिशाभूल करणारे ठरेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ च्या पहिल्या टप्प्यात मतदार अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर सर्वसाधारणपणे वास्तव्यास असल्याची वस्तुस्थिती पडताळण्यावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे संबंधित पत्त्यावर प्रत्यक्ष वास्तव्यास नसलेल्या व्यक्तींची नावे प्रारूप यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. तसेच मृत मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.दरम्यान, सध्या सुरू असलेल्या पुढील टप्प्यात अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर उपलब्ध नसलेले किंवा दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेले, मात्र राज्याच्या हद्दीतच वास्तव्यास असलेले मतदार त्यांच्या सध्याच्या निवासस्थानी मतदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज करू शकतात. याशिवाय १ ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नवमतदारांच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे.विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पहिल्या टप्प्यात दीर्घकाळ घराबाहेर राहणे अथवा अन्य कारणांमुळे ज्यांची नावे प्रारूप यादीत समाविष्ट होऊ शकली नाहीत, अशा पात्र नागरिकांनाही आता मतदार म्हणून नोंदणीसाठी अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे सध्याचा टप्पा हा प्रामुख्याने पात्र मतदारांची नावे समाविष्ट करण्यावर केंद्रित आहे.

# धर्माबाद आगारात स्मार्ट कार्डच्या नावाखाली महिला–ज्येष्ठ प्रवाशांची लूट?

धर्माबाद/प्रतिनिधी-राज्य परिवहन महामंडळाने स्मार्ट कार्डची सक्ती केल्याने धर्माबाद परिसरातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्मार्ट कार्डसाठी १९९ रुपये शुल्क, त्यात किमान १०० रुपये शिल्लक ठेवण्याची सक्ती आणि कार्ड काढण्यासाठी होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे सवलतीच्या प्रवासाऐवजी प्रवाशांवरच आर्थिक व मानसिक भुर्दंड पडत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागातील अनेक महिला व ज्येष्ठ नागरिक अद्याप डिजिटल व्यवहारांशी पूर्णपणे परिचित नाहीत. अशा परिस्थितीत स्मार्ट कार्ड काढण्यासाठी आधार आधारित प्रक्रिया, बोटांचे ठसे आणि इतर तांत्रिक बाबींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः वयोवृद्ध नागरिकांचे बोटांचे ठसे यंत्रावर उमटत नसल्याने त्यांना वारंवार धर्माबाद आगारात हेलपाटे मारावे लागत आहेत.स्मार्ट कार्ड काढल्यानंतरही प्रवाशांच्या अडचणी संपत नसल्याचे चित्र आहे. कार्डमध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास किंवा यंत्रावर कार्ड स्वीकारले गेले नाही, तर काही वेळा वाहकांकडून प्रवाशांना थेट पूर्ण भाड्याचे तिकीट घ्यावे लागत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे सवलतीच्या प्रवासासाठी कार्ड काढूनही प्रत्यक्ष प्रवासाच्या वेळी सवलत मिळणार की नाही, याची शाश्वती राहिलेली नाही.महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के प्रवास सवलत देण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी त्यासाठी स्वतंत्र स्मार्ट कार्डची सक्ती करून त्यावर शुल्क आकारणे आणि खात्यात किमान रक्कम ठेवण्याची अट घालणे कितपत योग्य, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा भाजपकडून सत्कार

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यात राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची कार्यकारिणी नव्याने जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या वतीने नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शासकीय विश्रामगृह येथे भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपचे तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख यांनी केले होते.

यावेळी राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे अध्यक्ष उत्तम हनुमंते यांचा सत्कार भाजप तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. उपाध्यक्ष अब्दुल रजाक यांचा सत्कार माजी जिल्हा परिषद सदस्य भीमराव पाटील कल्याणे यांच्या हस्ते करण्यात आला. सचिव साहेबराव गागलवाड यांचा सत्कार राम खांडरे यांनी, तर गोविंद गुजरवाड यांचा सत्कार संतोष गाडे यांनी केला. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार जयराम वणे, माजी तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, राहुल चौदंते, राजेश महाशेटे, राहुल कोलते, धम्मदाता कांबळे, साहेबराव हौसरे यांच्यासह अन्य पत्रकारांचाही भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



पत्रकारिता ही लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकारांकडून केले जाते. ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या, विकासकामे आणि प्रशासनाशी संबंधित विषय प्रभावीपणे मांडण्यासाठी पत्रकार संघटनांची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त कार्यकारिणीचे उपस्थितांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मानव्य विकास विद्यालयात ४३ विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप

देगलूर/प्रतिनिधी-शहरातील मानव्य विकास विद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी मानव विकास योजनेअंतर्गत शाळेतील ४३ विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप करण्यात आले.



सदरील शाळेमध्ये शहरातील व परिसरातील कारेगाव, आचेगाव, बागन टाकळी, रामपूर, लिंगणकेरूर, देगाव, भायेगाव, मलकापूर, आदी खेडेगावातील मुली शिक्षणासाठी शाळेत चालत येत असतात.परंतु सदरील ४३ मुलींना मानव विकास योजनेअंतर्गत असलेल्या सायकली मिळाल्या मुळे आता या मुलींची पायपीट बंद होणार आहे. सायकली मिळाल्यामुळे मुलींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. शाळेचे मुख्याध्यापक संतोष कोल्हे, उपमुख्याध्यापक श्याम कोल्हे, पर्यवेक्षक शरद हांद्रे, प्रा.एस. पी.गाडवे, शिक्षक प्रतिनिधी संजय कल्याणी, शाळेचे सहशिक्षक सुजित कांबळे, बालाजी पिंडकुरवार ,सय्यद ए.एम., राजेश चौडेकर,मंगेश कपाळे, आदी उपस्थित होते.

# मांडवीचे हृदय राठोड यांची निवड

मांडवी/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाअंतर्गत सुधारित धोरण आखण्यासाठी गठीत राज्यस्तरीय समितीवर किनवट तालुक्यातील मांडवी येथील सामाजिक कार्यकर्ते हृदय राठोड यांची ‘सदस्य’ म्हणून निवड झाली आहे.



राज्यातील मत्स्य व्यवसाय, मच्छीमार व आदिवासी बांधवांचे प्रश्न सोडवून नवे लोकाभिमुख धोरण तयार करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे. राठोड यांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्य आणि अनुभवाची दखल घेत शासनाने ही जबाबदारी दिली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, आदिवासी व मच्छीमारांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार हृदय राठोड यांनी व्यक्त केला आहे.

# माहूरमध्ये अतिक्रमण हटाव मोहिमेवरुन खळबळ

## छोट्या व्यावसायिकांवर कारवाईचा हातोडा,टोलेजंग इमारतींकडे मात्र डोळेझाक



माहूर:अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाई करायची आणि तीही निवडक पद्धतीने करायची, असा प्रकार सुरू झाला तर प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. माहूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गालगत सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेने सध्या शहरात चांगलीच चर्चा रंगली असून, या मोहिमेत गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांनाच लक्ष्य केले जात असल्याचा आरोप होत आहे.

अतिक्रमण हटाव मोहीम ही कायद्याच्या चौकटीत होत असेल तर तिचे स्वागतच झाले पाहिजे. सार्वजनिक रस्ते, महामार्ग आणि शासकीय जागा अतिक्रमणमुक्त असणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, ही जबाबदारी पार पाडताना कारवाईचा हातोडा सर्वांसाठी समान पद्धतीने चालला पाहिजे. गरीबाचे पत्र्याचे शेड असो, छोट्या व्यावसायिकाचे दुकान असो किंवा कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली टोलेजंग इमारत असोकायद्याच्या नजरेत सर्व समान असतील तर कारवाईतही तोच समानपणा दिसला पाहिजे, अशी मागणी ही मेघराज जाधव यांनी केली आहे.नोटिसा मिळाल्यानंतर अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांनी प्रशासनाशी संघर्ष करण्याऐवजी स्वतःहून आपली पत्रे, शेड, दुकानांचे पुढील भाग आणि इतर बांधकामे हटविली. अनेकांच्या उदरनिर्वाहाचा आधार असलेली छोटी दुकाने कारवाईच्या भीतीने नेस्त नाबूत झाली. काहींनी कर्ज काढून उभारलेले व्यवसायाचे छोटेसे छप्पर स्वतःच उतरविले. प्रशासनाच्या कारवाईसमोर सर्वसामान्य नागरिकांनी नमते घेतले. पण त्याचवेळी मोठ्या बांधकामांकडे पाहताना प्रशासनाची नजर का थांबते, हा प्रश्न आता माहूर मध्ये चर्चेचा विषय बनला आहे. माहूर शहरात अतिक्रमणाचा प्रश्न नवीन नाही. महामार्गालगत तसेच शहरातील विविध भागांत अनेक वर्षांपासून बांधकामे, शेड, दुकानांचे वाढीव भाग आणि इतर संरचना उभ्या राहिल्या आहेत. काही ठिकाणी रस्त्याची हद्द, शासकीय जागा किंवा महामार्गाची जमीन याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे प्रशासनाने सर्वेक्षण करून अतिक्रमणाची अधिकृत यादी जाहीर करावी आणि त्या यादीतील प्रत्येक बांधकामावर समान निकषाने कारवाई करावी, अशी मागणी लघु व्यावसायिक प्रमोद राठोड यांनी केली आहे. ज्याच्याकडे पैसा नाही त्याच्यावर कारवाई आणि ज्याच्याकडे पैसा व राजकीय वजन आहे त्याला अभय, अशी भावना शुक्रवारी झालेल्या अतिक्रमन हटाव मोहिमे मुळे निर्माण झाली आहे.

अतिक्रमण हटाव मोहिमेच्या पार्श्वभूमीवर काही मोठ्या इमारत मालकांशी संबंधित विभागाची कथित मोठी डिलिंग झाल्याचा गंभीर आरोप मेघराज जाधव यांनी केला आहे. या आरोपामुळे प्रशासनाच्या कारवाईच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून महामार्गालगतच्या अतिक्रमणावर कारवाई होत असेल तर नेमकी कोणती बांधकामे अतिक्रमणाच्या कक्षेत येतात, कोणाला नोटिसा देण्यात आल्या, किती जणांनी स्वतःहून अतिक्रमण हटविले आणि किती बांधकामांवर प्रत्यक्ष कारवाई करण्यात आली, याची माहिती विभागीय आयुक्त जी श्रीकांत आणि जिल्हाधिकारी डॉक्टर राहुल कर्डिले यांनी मागवितली तर अतिक्रमन हटाव मोहिमेतील भ्रष्टाचारावर शिक्कामोर्तब होऊन अनियमित्ता दिसून येईल.

# आदिवासी शाळांमध्ये शिक्षकपदे कायम ठेवा

## संच मान्यतेचे निकष बदलण्याची मागणी

किनवट/प्रतिनिधी-बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, शाळांमध्ये शिक्षकांची उपलब्धता व विद्यार्थी-शिक्षक प्रमाणाबाबत मानके निश्चित करण्यात आलीत. मात्र प्रत्यक्षात दुर्गम व आदिवासी भागातील शाळांची केवळ विद्यार्थी संख्येच्या आधारे संच मान्यता निश्चित केल्यास, कमी विद्यार्थी असलेल्या शाळांमध्ये आवश्यक शिक्षकपदे कमी होण्याची शक्यता आहे. त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर होतो. त्यामुळे आदिवासी, पेसा, नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील शाळांना विद्यार्थी संख्येचा निकष न लावता, भौगोलिक परिस्थितीचा विचार करून संच मान्यता निश्चित करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन म.रा.प्रा. शि. संघ नांदेड जिल्हा शाखेने जि. प.चे सीईओ महेश पाटील यांना दिले.

प्रत्येक वर्गासाठी आवश्यक शिक्षक उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संच मान्यतेचे निकष निश्चित करण्यात यावेत. विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे शिक्षकपदं कमी अथवा शिक्षकविरहित शाळा होणार नाही, यासाठी विशेष तरतूद करावी.आगामी ३० सप्टेंबर रोजीच्या संच मान्यतेच्या प्रक्रियेपूर्वी आदिवासी व दुर्गम भागातील शाळांसाठी विशेष निकष निश्चित करण्याबाबत शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा. आरटीई कटमधील बालकांच्या शिक्षणाच्या अधिकाराचा उद्देश लक्षात घेऊन, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणे समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल, यासाठी आवश्यक शिक्षक पदे उपलब्ध करून द्यावीत. शासन निर्णय होईपर्यंत आदिवासी, पेसा, नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील शाळांवर विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक पदकपात करण्याबाबत शिवाय संच मान्यतेसाठी विद्यार्थी संख्येची अट शिथिल करण्यापूर्वी संवेदनशीलतेने विचार करावा अशी मागणी आहे.वरील सर्व बाबींचा कायदेशीर, सामाजिक व शैक्षणिक दृष्टिकोनातून गांभीर्याने विचार करून, आदिवासी व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी आपल्या स्तरावरून शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, जिल्हा शाखा नांदेड यांनी केली आहे.बाबुराव फसमले जिल्हा नेते, बाबुराव माडगे जिल्हाध्यक्ष, शिवाजी शेटकर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष, राजीव सावरकर जिल्हा कार्याध्यक्ष, रामदास केंद्रे जिल्हा कोषाध्यक्ष, राजकुमार बाविस्कर किनवट तालुकाध्यक्ष यांच्या सदर निवेदनावर स्वाक्षऱ्या असल्याचे प्रसिद्धीप्रमूख प्रशांत झरीवाड यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# जरांगेंच्या मुंबई आंदोलनावर बंदी घालता येणार नाही-मुंबई हायकोर्ट

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या मुंबई आंदोलना विरोधात भीतीपोटी बंदी घालता येणार नाही. परंतु यंत्रणेने मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची नियमित तपासणी करुन काळजी घ्यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.

मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर या आंदोलनाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश देत परवानगीशिवाय मुंबईत आंदोलन करता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या आरोग्याची वैद्यकीय तपासणी करावी आणि गरज भासल्यास त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचनाही न्यायालयाने दिल्या.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जरांगे पाटील यांनी आंदोलनाची आक्रमक भूमिका कायम ठेवली आहे. त्यांच्या उपोषणाचा आज १४ वा दिवस असून, आता मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा त्यांनी केली आहे. मुंबईतील आंदोलनाची पुढील दिशा आणि तारीख निश्चित करण्यासाठी शनिवारी अंतरवाली सराटी येथे मराठा बांधवांची राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीत जरांगे पाटील मुंबई आंदोलनाची तारीख जाहीर करण्याची शक्यता आहे. मात्र, त्यापूर्वीच उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे आंदोलनाच्या नियोजनासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे.मुंबईत मोठ्या संख्येने मराठा बांधव सहभागी झाल्यास वाहतूक, सार्वजनिक व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता याचिकेत व्यक्त करण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर जरांगे पाटील कोणती भूमिका घेतात, आंदोलनाची तारीख काय ठरवतात आणि पुढील रणनीती कशी आखतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# जरांगेंविरोधात बारस्कर आक्रमक;पोलिसांत तक्रार

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात वातावरण तापले असतानाच कीर्तनकार ह. भ. प. अजय महाराज बारस्कर यांनी मनोज जरांगे यांच्याविरोधात मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. जरांगे यांनी एका मुलाखतीत आक्षेपार्ह, चिथावणीखोर आणि हिंसात्मक भाषा वापरल्याचा आरोप बारस्कर यांनी केला.

राज्यातील मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि मंत्र्यांविरोधात धमकीवजा वक्तव्ये करणे गंभीर असून, अशा वक्तव्यांची पोलिसांनी दखल घ्यावी, अशी मागणी बारस्कर यांनी केली. मुंबईत आंदोलनासाठी येण्याच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असेही त्यांनी म्हटले.दरम्यान, बारस्कर यांनी मनोज जरांगे यांच्याशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी ईडीकडेही केल्याचा दावा केला आहे. काही व्यक्तींच्या वाळू व्यवसायाशी संबंधित व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला असून, यासंदर्भातील पुरावे ईडीकडे दिल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही

# पुराव्याअभावी मराठा समाजाची निराशा;निजामकालीन नोंदींच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे व पुराव्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी मरखेल येथे महसूल विभागाच्या वतीने विशेष शिबिर घेण्यात आले. शिबिरात मराठा समाजातील नागरिकांना कुणबी नोंदी, वंशावळ, जुने दस्तऐवज व इतर आवश्यक पुराव्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मात्र, अनेक नागरिकांकडे पूर्वजांच्या जुन्या नोंदी उपलब्ध नसल्याने प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

हे शिबिर मरखेल मंडळ अधिकारी भास्कर इप्पर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. यावेळी तलाठी पी.जी. पवार, बामणीकर, वि.टी. मठवान, शेख सलीम, सोनवणे तसेच ऋषिकेश महञे यांनी नागरिकांना आवश्यक कागदपत्रे, जुन्या नोंदी, वंशावळ आणि कुणबी नोंदींबाबत मार्गदर्शन केले.दरम्यान, संदीप किशनराव पाटील यांनी तहसीलदार, देगलूर यांच्याकडे निवेदन पाठवून मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र व मराठवाड्यातील उपलब्ध ५८ लाख नोंदींच्या आधारे मराठा समाजातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.विशेष म्हणजे, मरखेल व मरखेल मंडळाचा परिसर तेलंगणा सीमेलगत असल्याने निजामकालीन राजवटीतील महसुली व शासकीय नोंदींचा आधार घेऊन कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणीही तहसीलदार, देगलूर यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या जुन्या महसुली व निजामकालीन नोंदींची तपासणी करून पात्र नागरिकांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.शिबिरात नागरिकांनी पुरावे व कागदपत्रांबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. पूर्वजांच्या नोंदीच उपलब्ध नसतील तर पुरावे आणायचे कुठून? असा सवाल अनेक नागरिकांनी उपस्थित केला. त्यामुळे प्रशासनाने जुन्या महसूल नोंदी, निजामकालीन अभिलेख तसेच उपलब्ध शासकीय कागदपत्रांची तपासणी करून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करावे, अशी मागणी पुढे आली आहे.



सिडको येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळा विटंबनेच्या निषेधार्थ आज (शुक्रवार) सिडको-हडको व परिसरात कडकडीत बंद पाळण्यात आला. पुतळा विटंबना करणाऱ्या आरोपी विरुध्द कठोर कार्यवाही करावी अशी मागणी सर्वपक्षीय संघटनांच्यावतीने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना निवेदन देवून करण्यात आली.

पान १ वरुन

### मराठवाड्यातील दुष्काळ परिस्थितीकडे...

मोहन पाटील, शिवसेनेचे संपर्कप्रमुख बबन थोरात, माजी आ.अनुसयाताई खेडकर, किशोर पोतदार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, ज्योतीबा खराटे, बबन बारसे, डॉ.भगवान मनुरकर, प्रा.पुरुषोत्तम धोंडगे, धोंडू पाटील, सुनिल कदम, विजय बगाटे, डॉ.राम चव्हाण यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खा.संजय राऊत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन दिले.

### पोलीस पथकावरील हल्ल्या...

रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलिस अधीक्षक अर्चना पाटील घटनास्थळी दाखल झाल्या. दरम्यान, उमरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जयप्रकाश गुठे यांच्यासह मोठ्या संख्येने पोलिस कर्मचारी घटनास्थळी तैनात करण्यात आले आहेत. उमरी, मुदखेड, नायगाव, कुंटूर, बिलोली आणि धर्माबाद येथून अतिरिक्त पोलिस कुमकही घटनास्थळी दाखल झाली आहे.हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी चार पथके तयार केली असून, संशयितांचा शोध सुरू आहे. काही संशयित आरोपींना पोलीसांनी अटक केली असून मुख्य रेती तस्कर फरार झाले आहेत.

### बँक कर्मचाऱ्यांच्या संपाला...

अधिकारी-कर्मचाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असून, त्यांच्या न्याय्य मागण्यांवर संवादाच्या माध्यमातून तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. नांदेड येथील आंदोलनामुळे विविध बँकांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांची एकजूट, संघटनात्मक ताकद आणि आपल्या न्याय्य मागण्यांसाठीचा निर्धार अधोरेखित झाला. या आंदोलनात किरणकुमार जिंतूरकर, विनोद गडप्पा, कपिल ढवळे, सदाशिव चाळणेवाड, शिल्पा जिंतूरकर, राहुल खेडकर, प्रबोधन भावसार, सौरभ राष्ट्रवाड, मनोज शिवनगावकर, अपर्णा मुखेडकर, प्रमोद संगेवार, रुशेष मणी यांच्यासह बँकेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

### एमपीएससी सचिवांच्या तोंडाला काळे फासले;...

प्रकाराचे चित्रीकरण तिसरा कार्यकर्ता करीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी तिन्ही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, या घटनेनंतर संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रवक्ते संतोष शिंदे यांनी एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.संभाजी ब्रिगेडने यापूर्वी ३ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलन केले होते. त्या वेळी सरकारला इशारा देण्यात आला होता, असा दावा शिंदे यांनी केला. मात्र, त्यानंतरही प्रश्न सुटले नसल्याने संघटनेने आक्रमक पवित्रा घेतल्याचे त्यांनी सांगितले.

# सीताखंडी घाटातील भीषण अपघात प्रकरणी मुख्यमंत्री,पालकमंत्री यांनी व्यक्त केले दुःख

नांदेड/प्रतिनिधी-भोकर-बारड राष्ट्रीय महामार्गावरील सीताखंडी घाटात गुरुवारी (दि.१०) सायंकाळी ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून घटनेची माहिती घेतली. अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना आवश्यक ती शासकीय मदत तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच जखमींना आवश्यक उपचार व वैद्यकीय सुविधा मिळतील, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.या अपघातातील जीवितहानीबद्दल पालकमंत्री अतुल सावे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या दुःखद घटनेत जीवितहानी झाल्याने मनस्वी दुःख झाले. या कठीण प्रसंगी माझ्या संवेदना शोकाकुल कुटुंबीयांसोबत आहेत. अपघातातील मृत व्यक्तींच्या निकटवर्तीयांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपयांची सानुग्रह मदत मिळण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या घटनेची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही देण्यात आली असून त्यांनी या दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४